


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २८८ वा | शुक्रवार दि ३० जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# निवडणुकांच्या तोंडावर भाजपची जागेवर कारवाई...

## एक-दोन नव्हे, तब्बल २३ नेत्यांची पक्षातून हकालपट्टी, धक्कादायक कारण समोर

**वृत्तसंस्था/ सिंधुदुर्ग**

कोकणात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच भाजपाने पक्ष शिस्तीच्या विरोधात काम करणाऱ्या तब्बल २३ पदाधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम केल्याने ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. २३ जणांना पक्षातून तब्बल सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. निवडणूक काळात पक्षविरोधी काम केल्यास थेट कारवाई केली जाईल असाच संदेश स्पष्ट इशारा या कारवाईतून भाजपने दिला आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात उमेदवारी अर्ज कायम ठेवणे अथवा विरोधी उमेदवारांना मदत करणे, या आरोपावरून भाजपच्या २३ पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. भाजपचे सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. या कारवाईमध्ये जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र म्हापसेकर, माजी सभापती वंदना किनळेकर, माजी सभापती शर्वाणी गावकर, राजन चिके यांसारख्या भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश असून एकूण २३ जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर ही कारवाई करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे : राजन बाळकृष्ण चिके (फोंडा, ता. कणकवली), राजेंद्र दत्ताराम म्हापसेकर (कोनाळकट्टा, ता. दोडामार्ग), श्रीमती सुजाता अजित पडवळ (तुळस, ता. वेंगुर्ला), श्रीमती वंदना किरण किनळेकर (म्हापण, ता. वेंगुर्ला), विजय महादेव रेडकर (मातोंड, ता. वेंगुर्ला), जनार्दन रुक्मानंद कुडाळकर (आडेली, ता. वेंगुर्ला), डायगो उर्फ मायकल फ्रान्सिसी डिसोजा (कोलगाव, ता. सावंतवाडी), जितेंद्र पांडुरंग गावकर (माजगाव, ता. सावंतवाडी), योगेश अशोक केणी (इन्सुली, ता. सावंतवाडी), स्वागत रघुवीर नाटेकर (इन्सुली, ता. सावंतवाडी), नितीन एकनाथ राऊळ (इन्सुली, ता. सावंतवाडी) यांच्यावर बडगा उगारण्यात आला आहे. याशिवाय, श्रीमती शर्वाणी शेखर गावकर (आरोंदा, ता. सावंतवाडी), उल्हास उत्तम परब (सातार्डा, ता. सावंतवाडी), श्रीमती स्नेहल संदीप नेमळेकर (आरोंदा, ता. सावंतवाडी), श्रीमती साक्षी संदीप नाईक (ता. दोडामार्ग), श्रीमती सुप्रिया शैलेश नाईक (ता. दोडामार्ग), श्रीमती सुनीता कमलाकर भिसे (ता. दोडामार्ग), प्रवीण नारायण गवस (ता. दोडामार्ग),



अनिरुद्ध फाटक (ता. दोडामार्ग), श्रीमती सोष्मिता अरविंद बांबर्डेकर (ओरोस, ता. कुडाळ), योगेश राजाराम तावडे (ओरोस, ता. कुडाळ), रुपेश अशोक पावसकर (नेरूर, ता. कुडाळ) आणि विजय वासुदेव नाईक (आडेली, ता. वेंगुर्ला) या २३ जणांवर पक्षातून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# मुंबई शेजारीच उभारणार पहिलं समुद्रातील विमानतळ; ४५ हजार कोटींचा खर्च; सी-लिंक, बंदराशी थेट जोडणी...

**वृत्तसंस्था/ पालघर**

भारतातील पहिलं समुद्रातील विमानतळ मुंबईलगतच्या पालघर जिल्ह्यात उभारण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पालघरमधील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. पालघरमधील वाढवण बंदराजवळ समुद्रात तयार करण्यात येणाऱ्या कृत्रिम बेटावर हे विमानतळ उभारण्याची योजना असून, त्यासाठी सुमारे ४५ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर आणि त्याला जोडण्यात येणाऱ्या विविध रस्ते प्रकल्पांमुळे परिसराचा वेगाने विकास होत आहे. आता या भागात विमानतळ उभारण्यात येणार असल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होणार आहे. एकूण खर्चापैकी सुमारे २५ हजार कोटी रुपये केवळ समुद्रातील जमिनीच्या पुनःप्राप्तीसाठी खर्च करण्यात येणार आहेत. उर्वरित निधीचा वापर टर्मिनल इमारती, धावपट्ट्या (रनवे), एअरसाईड व लँडसाईड सुविधा उभारण्यासाठी केला जाणार आहे.

हे विमानतळ पालघरच्या किनाऱ्यालगत समुद्रात उभारल्या जाणाऱ्या पूर्णतः कृत्रिम बेटावर बांधण्यात येणार आहे. विमानतळाची रचना दरवर्षी ९० दशलक्ष प्रवाशांना हाताळण्याच्या क्षमतेनुसार करण्यात येणार असून, तो देशातील सर्वात मोठ्या विमानतळांपैकी एक ठरणार आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड () कडून गेल्या वर्षी सुरू करण्यात आलेला पूर्व-व्यवहार्यता अभ्यास सध्या अंतिम टप्प्यात आहे. या विमानतळावर दोन समांतर धावपट्ट्या असतील. तसेच दरवर्षी ३ दशलक्ष मेट्रिक टन मालवाहतूक हाताळण्याच्या क्षमतेसह हा विमानतळ एक प्रमुख हवाई मालवाहतूक केंद्र म्हणून विकसित केला जाणार आहे. विशेष म्हणजे, सर्व-हवामान अनुकूल असलेल्या ग्रीनफिल्ड खोल-पाणी वाढवण बंदराशी विमानतळाचा थेट एकात्मिक संबंध असणार आहे. विमानतळाची कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी पूर्व-व्यवहार्यता अहवालात अनेक महत्त्वाच्या जोडण्यांचा प्रस्ताव



आहे. यामध्ये वडोदरामुंबई द्रुतगती मार्गाशी (- ) थेट जोडणी, पश्चिम रेल्वेशी मेट्रो लिंक, तसेच मुंबईअहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरशी कनेक्टिव्हिटी यांचा समावेश आहे. याशिवाय, हे विमानतळ नियोजित उत्तनविरार सी लिंकशीही जोडले जाणार आहे. ही सी लिंक मुंबई महानगर प्रदेशाला दिल्लीमुंबई द्रुतगती मार्गाशी जोडणाऱ्या आठ पदरी उत्तरदक्षिण वेगवान कॉरिडॉरचा महत्त्वाचा भाग असणार आहे. त्यामुळे वाढवण येथील समुद्रातील विमानतळ मुंबई महानगर प्रदेशाच्या वाहतूक नकाशावर निर्णायक भूमिका बजावणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चॉकलेटच्या बंगल्याची कालातीत गोडी



पार्श्वगायनापेक्षा कविता स्वरबद्ध करणं हा माझ्या आवडीचा प्रांत. ङ्गमाणसाला पंख असतातफ (१९६१) हा मी संगीत दिलेला पहिला चित्रपट. मात्र, त्यास सुरुवातीस मी नकार दिला होता. दिग्दर्शक माधव शिंदे व बाळने मला खूप आग्रह केला. तरीही मी बाळला नाहीच म्हणाले. शेवटी बाळने हुकमी पत्ता काढला. तो म्हणाला, की ङ्गविचार कर, या चित्रपटाची कथा व गीतं वि. स. खांडेकर यांची आहेत.फ भाऊंचं नाव कळल्यानंतर मी लगेच तयार झाले. ते माझे अतिशय आवडते लेखक. त्यांच्या सर्व पुस्तकांची मी पारायणं केली होती आपल्या आवडत्या लेखकासोबत काम करण्याची संधी मी कशी दवडेन? बाबांच्या अनेक चिजा मला पाठ होत्या. त्यातील एका चिजेच्या आधारे मी ङ्गये जवळी, घे जवळी प्रिय सखया भगवंताफ या गीताचा मुखडा तयार केला, पुढची चाल मी लावली. हे गाणं गायला सोपं नाही, मात्र दीदीने नेहमीप्रमाणे ते लीलया गायलं. या गाण्यासह त्यातील सर्वच गाणी चांगली झाली. चित्रपटही चालला व पुरस्कारही मिळाले. गंमत म्हणजे, समीक्षकांनी या गाण्यांवर टीका केली. मंगेशकरांनी केवळ गाणी गावीत, चाली देण्याच्या फंदात पडू नयेफ असं छापून आलं. मी बाळला विचारलं, ङ्गकाय रे हे, आता काय करायचं?फ त्यावर तो म्हणाला, ङ्गकाही नाही गं, दुर्लक्ष कर. काही वर्षांनी हीच गाणी सर्वजण डोक्यावर घेतील.फ बाळचं भाकीत अक्षरश: खरं ठरलं. कालांतराने ङ्गये जवळीफ हे गाणं अतिशय लोकप्रिय झालं, आजही ते गाणं आवडीने ऐकलं जातं. याच काळात आमच्याकडे माझ्यासाठी वरसंशोधन सुरू होतं. इंदौरमधील माझ्या मावशीने खडीकरांचं स्थळ सुचवलं आणि सर्वांच्या पसंतीनं १९६३मध्ये माझं त्यांच्याशी लग्न झालं. हा सोहळा बाबांनी अन्यत्र करूच दिला नसता. त्यामुळे कोल्हापूरमधील जयप्रभा स्टुडिओला लग्नघराचं रूप देण्यात आलं. तिथेच सर्व वऱ्हाडी जमले. दीदीने माझ्या लग्नाचा असा काही बार उडवला की सगळे बघतच राहिले. सकाळ-संध्याकाळ पंचपक्वान्नांच्या पंगती उठत होत्या. दीदी, आशाताई, उषा पदर खोचून पाहुण्यांना आग्रहाने पक्वान्नं वाढत होत्या. आता खरं वाटणार नाही, परंतु हळद संपल्याने ती पुण्याहून मागवावी लागली. सुवासिनींसाठी खण कमी पडल्याने जरीच्या साड्यांपासून खण करण्यात आले. स्टुडिओमध्ये बांगड्यांचा एक स्टॉलच उभारण्यात आला होता. हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील गायक, संगीतकार, निर्माते, दिग्दर्शक वगैरे आवर्जून उपस्थित होतेच, परंतु दक्षिणेतून शिवाजी गणेशनही मंगेशकरांवरील प्रेमापोटी सपत्निक आले. या सोहळ्यादरम्यान पं. भीमसेन जोशी यांची मैफलही आयोजित करण्यात आली होती. लग्नानंतर आम्ही मुंबईतच व पेडर रोडवरच एका इमारतीत राहण्यास आलो. त्यामुळे माई व सर्व भावंडांचा सहवास कायम राहिला. १९६४मध्ये योगेशचा जन्म झाला व त्यानंतर रचनाचा. मुलं थोडी मोठी झाल्यानंतर लहान मुलांची गाणी करावीत व ती लहानांकडूनच गाऊन घ्यावीत, अशी कल्पना माझ्या मनात आली. ही गोष्ट साधारण १९७१-७२ची. पुण्यातून मला राजा मंगळवेढेकर यांचं एक पुस्तक मिळालं. त्यातील दोन गीतं खूपच छान होती. ङ्गअसावा सुंदर चॉकलेटचा बंगलाफ व ङ्गकोणास ठाऊक कसा, पण सर्कशीत गेला ससाफ या बालगीतांना मी चाली लावल्या. योगेश व रचना ही माझी मुलं या गाण्यांसाठी योग्य होती. याशिवाय, श्रीनिवास खळे यांना मी त्यांच्या मुलीबाबत म्हणजे शमाविषयी विचारलं. तेही हो म्हणाले. एचएमव्हीच्या अधिकाऱ्यांचं मत मात्र वेगळं होतं. त्याकाळी बालगीतंही मोठ्या गायिका गात असत, त्यामुळे त्यांनी माझ्या या कल्पनेविषयी त्यांनी साशंकता व्यक्त केली. परंतु ही गाणी नक्की गाजतील, असं ठामपणे सांगून मी हे आव्हान स्वीकारलं. अखेर, ङ्गअसावा सुंदर चॉकलेटचा बंगलाफ हे गाणं या तिघांच्या स्वरात ध्वनिमुद्रित झालं व कोणास ठाऊक कसाफ हे गाणं शमाने गायलं. मात्र या ङ्गईपीफसाठी (एक्स्टेंडेड प्ले) एका गाणं कमी पडत होतं. त्यामुळे मी शांता शेळके यांना विनंती केली. त्यांनी झटपट एक बालगीत लिहून दिलं. ते गाणं म्हणजे, ङ्गखोडी माझी काढाल तर अशी मारीन फाइटफ हे गाणं योगेश गायला. अशाप्रकारे ङ्गचॉकलेटचा बंगलाफ ही ईपी बाजारात आली आणि तिचं सर्वत्र अभूतपूर्व स्वागत झालं. यानंतर मंगेश पाडगावकर यांचा टीव्हीवरील एक कार्यक्रम पाहण्यात आला. त्यात त्यांनी ङ्गसांग सांग भोलानाथफ हे बालगीत सादर केलं होतं. तेही खूप छान होतं. मी त्यांना लगेच फोन करून त्याचं गाणं करण्यासाठी विचारलं. त्यांनी आनंदाने होकार दिला व पुस्तक नंतर वाचाफ ङ्गआम्ही कोळ्याची पोरंफ, ङ्गमाझ्या ताईला नवरा आणायचाफ यांसारखी त्यांची अन्य बालगीतंही त्यांनी दिली. ङ्गसांग सांग भोलानाथफ हे गाणंही योगेश, रचना व शमाने गायलं. या ध्वनिमुद्रिकांमधील बालगीतांचंही खूप कौतुक झालं. कवयित्री वंदना विटणकर यांनी ङ्गयेरे येरे पावसा रुसलास काफ, ङ्गआला आला पाऊस आलाफ, ङ्गए आई मला पावसात जाऊ देफ, ङ्गपिरपिर पिरपिर पावसाचीफ ही बालगीतं लिहून दिली. या गाण्यांच्याही रेकॉर्ड आल्या. याशिवाय, ढील दे रे ढील दे कळकीच्या टोकावर चाललाय दोरफ, ही बालगीतंही सर्वांना आवडली. ङ्गचॉकलेटच्या बंगल्याफपासून सुरू झालेल्या या प्रवासातील सर्वच बालगीतं कालातीत ठरली. आज तिसऱ्या पिढीपर्यंत ही बालगीतं पोहोचली आहेत व त्यांची गोडी जराही कमी झालेली नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोल्हापूर शोकसागरात; नेत्यांच्या डोळ्यांत अश्रू, व्यापाऱ्यांनी व्यवहार ठेवले बंद..!



**कोल्हापूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनाने महाराष्ट्र हादरला असून, कोल्हापूर जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. बहुजन समाजाचे नेतृत्व करणारे एक रोखठोक नेते गेल्याने कोल्हापूरच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली असल्याचे मत स्थानिक नेत्यांनी व्यक्त केले. कागल, इचलकरंजी येथील कबनूरसह विविध भागांत व्यापारी वर्गाने दुकाने देखील बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण केली. जिल्हा बँकेकडून कर्मचाऱ्यांनीही सामूहिक शोकसभेत दादांप्रती श्रद्धांजली वाहिली, तर नेत्यांच्या प्रतिक्रियांमध्ये शोकाकुल भावनांचा भडिमार उमटला.कोल्हापूरचे काँग्रेसचे खासदार शाहू छत्रपती महाराज यांनी अजित पवारांबद्दल स्नेहपूर्ण आठवणी सांगितल्या. 'अजितदादा यांचे आणि आमचे ३० वर्षांचे ऋणानुबंध होते. बहुजन समाजाचे महत्वाचे नेतृत्व त्यांनी केले. अर्थव्यवस्थेचा चांगला अभ्यास असलेले अजितदादा अनेक वर्षे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री राहिले. शरद पवारांनी त्यांना ट्रेनिंग दिले होते. रोखठोक नेते असले तरी ते समयसूचक होते. एका रात्री त्यांचा फोन आला की सकाळी भेटणार, पण ९ वाजता भेटायचं ठरलं असताना ते सव्वाआठलाच पोहोचले. अशा वक्तशीर, स्पष्टवक्त्या नेत्याच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली,' असे शाहू महाराज म्हणाले.मंत्रिमंडळातील सहकारी आणि राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ यांना निधनाची बातमी समजताच अश्रू अनावर झाले. गेली ४० वर्षे अजितदादांसोबत राजकीय-सामाजिक जीवनात एकत्र असलेले मुश्रीफ म्हणाले, 'ज्यांच्या जीवावर आम्ही राजकारण केले, ते दादाच आम्हाला सोडून गेले.' बातमी ऐकताच घाय मोकलून रडलेले मंत्री मुश्रीफ तातडीने बारामतीकडे रवाना झाले.कागल आणि कबनुरमध्ये व्यापाऱ्यांनी व्यवहार बंद ठेवले. कागल येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर सर्वपक्षीय शोकसभा झाली. यात सर्वपक्षीय नेत्यांनी आपली अजितदादांच्या प्रति भाषणातून आदरांजली व्यक्त केली. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी देखील शोकसभा आयोजित करून दादांना श्रद्धांजली दिली. अजितदादांच्या अकाली निधनाने अवघा कोल्हापूर जिल्हा शोकाकुल झाला होता.भाजपचे राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांनी दादांबद्दलच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. 'अजित दादा म्हणजे चांदापापासून बांदापर्यंत प्रत्येक कार्यकर्त्याला नावानिशी ओळखणारे स्पष्टवक्ते नेते होते. 'धनंजय महाडिकना मुन्ना म्हणू नका' अशी त्यांची मजेदार भाषा एकदा भाषणात होती. पवार कुटुंबाशी जवळीक आहेच, मी राष्ट्रवादीत काम केले आहे. त्यामुळे अजित दादांच्या जाण्यामुळे निर्माण झालेली ही पोकळी कधीच भरून येणार नाही,' असे महाडिक म्हणाले.

## अजित दादांनी संबंध तुटू दिले नाहीत; उद्धव ठाकरे हळहळले



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने अवघा महाराष्ट्र हळहळला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रचार सभांच्या निमित्ताने मुंबईहून बारामती दौऱ्यावर निघाले असताना लँडिंगवेळी अजितदादांचे विमान कोसळून पेटल्याने ही दुर्घटना घडली. यामध्ये अजित पवारांसह विमानातील पाचही जणांचा मृत्यू झाला. वयाच्या अवघ्या ६६व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. अजित पवार यांच्या निधनाने पवार कुटुंबासह सर्वपक्षीय नेत्यांवर शोककळा पसरली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही भावना व्यक्त केल्या आहेतएक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,'' अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री राहिले होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने दादा होते. दादांना माझ्यातर्फे, ठाकरे व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली!

## शेतकऱ्यांच्या 'या' मागण्या मान्य, नाशिकहून निघालेलं लाल वादळ उद्या थंड होणार?

**मुंबई :** वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करावी, समुद्राला वाहून जाणारे पाणी स्थानिकांसाठी तसेच महाराष्ट्रातल्या कोरडवाहू भागासाठी वापरावे, पेसा भरती सुरू करून रोजगार उपलब्ध करावा आदी मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या लॉन्ग मार्चच्या पार्श्वभूमीवर आज अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळाने मंत्रालयातील बैठकीत शेतकऱ्यांची बाजू मांडली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, वन मंत्री गणेश नाईक, यांच्यासह मुख्य सचिव व विविध खात्यांचे अधिकारी यांच्यासोबत दोन तास किसान सभेच्या शिष्टमंडळाने विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.शिष्टमंडळाने यानंतर वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमध्ये काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. मान्य करण्यात आलेल्या सर्व मागण्यांच्या अंमलबजावणीची संपूर्ण हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. अंमलबजावणीत त्रुटी राहू नये यासाठी मंत्री स्तरावर सातत्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.वनाधिकार कायद्याच्या अंतर्गत दावे केलेल्या सर्व दावेदारांच्या वन हक्क दाव्यांची पुन्हा तपासणी करण्याचे यावेळी मान्य करण्यात आले. नावे करण्यासाठी पात्र करण्यात आलेली शेती व प्रत्यक्ष ताबा यातील तफावत वन विभागाच्या चुकीच्या अभिप्रायामुळे वाढली असून त्यामुळे हजारो शेतकऱ्यांवर अन्याय



झाला आहे. हा अन्याय दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये सर्व दाव्यांची पुन्हा तपासणी करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रांतांच्या अध्यक्षतेखाली अधिकाऱ्यांच्या समित्या नेमून प्रत्येक वन हक्क प्रकरण तपासण्याची घोषणा करण्यात आली. पुढील तीन महिन्यांत ही सर्व तपासणी करून वन जमीन धारकांना न्याय देण्यात येणार असून या प्रक्रियेला चालना देण्यासाठी मंत्र्यांच्या समावेशासह अंमलबजावणी समिती गठित करण्यात आली.वन जमिनीची पीक पाहणी लावून सर्व शासकीय योजनांचा लाभ वन जमीन धारकांना देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. आदिवासी विकासमंत्र्यांनी त्या संदर्भातले आदेश निर्गमित केले.वन जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांची भात खरेदी तसेच वरई नागली सावा व आदिवासी पिके, स्ट्रॉबेरी व बाळ हिरडा ही फळे रास्त दराने खरेदी केली जावी याबाबत किसान सभेने आग्रह धरला.

## दादांच्या निधनाने राष्ट्रवादीत उलथापालथ, सूत्र सुनेत्रा वहिनींकडे?

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचा तंबू ज्या अजित पवार नावाच्या मजबूत एकखांबी आधारावर उभा होता, तोच खांब अचानक निखळल्याने या पक्षात मोठी उलथापालथ होणार हे निश्चित आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे काही दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणातही प्रचंड वेगाने घडामोडी घडणार आहेत. आता सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही राजकारणातील सारीपाटाच्या खेळाची नव्याने मांडणी करावी लागणार आहे.दोन्ही राष्ट्रवादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने इतक्या जवळ आल्या होत्या, की शरद पवारांच्या राष्ट्रवादीने अजित पवारांच्या घड्याळावरच अनेक ठिकाणी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुका संपल्या, की काही महिन्यांतच काका-पुतण्यांचे हे दोन पक्ष एकत्र येणार ही काळ्या दगडावरची रेघ असल्याचे बोलले जात होते. अर्थात, या एकत्र येण्याबाबत अजित पवार यांच्या पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांचे



मतभेद पाहायला मिळत होते. मात्र, अजित पवार यांच्यानंतर या प्रक्रियेला खीळ बसते किंवा कसे, याबाबत कार्यकर्त्यांच्या मनात संभ्रम आहे.प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व पटेल पक्षाबाबत काय निर्णय घेतात हे महत्त्वाचे असेल. मात्र, त्याच वेळी धक्क्यातून संध्याकाळपर्यंत काही महत्त्वाचे नेते सावरल्यानंतर आता अशा आणीबाणीच्या प्रसंगी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडेच द्यायला हवी, असा सूर त्यांनी खासगीत आळवायला सुरुवात केली आहे.सुनेत्रा पवार या बारामती लोकसभा निवडणुकीस उभ्या राहिल्यापासून त्यांनी पक्षातील अनेक जबाबदाऱ्या घेण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे पक्षातील एका गटात याबाबत नकारात्मक चर्चा सुरू झाली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून सुनेत्रा यांनी पक्षाच्या कामात अधिकाधिक लक्ष दिले. त्यामुळे सुनेत्रा पवार या अगदीच अनुभवी नाहीत, अशा प्रसंगी कार्यकर्त्यांचा धीर वाढवायचा असल्यास त्यांच्याशिवाय पर्याय नाही, असे पक्षातील अनेक आमदार व बहुतांश कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास पुढे कशाप्रकारे जायचे याबाबत दोन्ही राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांमध्ये चर्चा झाल्याचे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात उघड बोलले जात होते. शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेतृत्व आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या पक्षाकडे असले, तरी वयोमानामुळे पक्षाच्या दैनंदिन कामकाजाकडे पूर्वीसारखे लक्ष देणे त्यांनाही शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर, दोन्ही राष्ट्रवादीच्या एकीकरणानंतरही त्या एकीकृत पक्षाचे प्रमुख नेते म्हणून अजित पवारच असणार अशीही चर्चा यानिमित्ताने दोन्ही पक्षांच्या वतुर्ळात केली जात होती. मात्र, अजितदादांच्या अपघाती निधनामुळे ही सगळीच गणिते संपुष्टात आली आहेत.विधानसभेत ४१ आमदारांचे नेतृत्व करणाऱ्या अजितदादांचा राज्य सरकारमध्ये मोठा दबदबा होता. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेले उपमुख्यमंत्रिपद व राज्याचे अर्थमंत्रिपद हे कुणाकडे द्यायचे हादेखील मोठा यक्षप्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसपुढे उभा आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात पवार घराण्यातील एकही मंत्री नाही, अशी परिस्थिती राष्ट्रवादी पक्षाला निर्नायकीकडे नेण्यास कारणीभूत ठरू शकते का, याचीही चिंता राष्ट्रवादीतील दिग्गज नेत्यांना सतावते आहे.

# पुण्यात तपासात दोघांना संपवल्याची घटना समोर

**बारामती :** बारामती तालुक्यातील सुपा पोलीस स्टेशन हद्दीतील काळखैरेवाडी गावाच्या परिसरात आढळून आलेल्या अनोळखी महिलेच्या खुनाचा तपास करताना एकतर्फी प्रेमातून घडलेल्या दुहेरी हत्याकांडाचा थरारक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी यापूर्वीही खून केलेला सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात आला आहे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा व सुपा पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने ही कारवाई करत आरोपी जैतू चिंधू बोरकर (वय ४३, रा. कोयंडे खुर्द, ता. खेड, जि. पुणे) याला अटक केली आहे.दि. १९ जानेवारी रोजी सकाळी बारामतीतील काळखैरेवाडी हद्दीतील खैरेपडळ परिसरात एका म हिलेचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. डोक्यावर गंभीर जखमा असल्याने तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. या घटनेबाबत सुपा पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक संदीप सिंह



गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व सुपा पोलीस स्टेशनच्या पथकांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, परिस्थिती जन्य पुरावे आणि घटनास्थळी सापडलेल्या एका डायरीच्या आधारे संशयाची सुई एका मजुराकडे वळली. चौकशीनंतर सीसीटीव्हीतील संशयित इसम हा जैतू चिंधू बोरकर असल्याचं निष्पन्न झालं.पोलिसांनी त्याला खेड परिसरातून ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी जैतू बोरकर याचे रंजना अरुण वाघमारे (वय २५, मूळ रा. खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड) हिच्यावर एकतर्फी प्रेम होते. तो तिला जबरदस्तीने आपल्यासोबत राहण्यास भाग पाडत होता. तिच्या विरोधामुळे व संशयातूनच त्याने आधी तिच्यासोबत काम करणाऱ्या सुरज अंकुश वाघ (वय ३०, रा. वांगणी, ता. बदलापूर, जि. ठाणे) याचा दि. १७ जानेवारी रोजी कोयंडे गावातील चौऱ्याचा डोंगर परिसरात कोयत्याने वार करून खून केला. यानंतर रंजनाला घेऊन तो सुपा परिसरात आला. दि. १८ जानेवारी रोजी रात्री काळखैरेवाडी भागात रंजनाने त्याच्यासोबत राहण्यास ठाम नकार दिला व पोलिसांत तक्रार करण्याची शक्यता व्यक्त केली. या भीतीने आणि रागाच्या भरात आरोपीने तिच्याही डोक्यात दगडाने मारून निर्घृण हत्या केली.येथे स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही खुनांमागे एकतर्फी प्रेम आणि संशय हाच प्रमुख कारण असल्याचे तपासात स्पष्ट झालं आहे.

## तीन दिरांनी मिळून वहिनीच्या भावाला संपवलं, भिवंडी हादरलं

**भिवंडी :** मावस बहीण आणि तिच्या पतीच्या भांडणात नातेवाईक मावस भावाने मध्यस्थी केली. या रागातून पतीच्या तीन भावांनी आपसात संगनमताने मध्यस्थी करणाऱ्या चुलत भावाला लोखंडी सुऱ्याने भोसकून जीवे ठार मारल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ही घटना भिवंडीतील शांतीनगर येथील न्यू आझाद नगर मधील निजामिया हॉटेलजवळ घडली असून या घटनेने परिसरात एकच शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.याप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करत तीन आरोपींना अटक पोलिसांनी दिली आहे. दिलशाद मकबूल अहमद शहा (२३) असे मृतकाचे नाव आहे. तर या हत्येप्रकरणी आसीफ अब्दुलहकीम शहा, अलीहसन अब्दुलहकीम शहा, मुझफ्फर अब्दुलहकीम शहा अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपी भावांची नावे आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गुलजार मकबूल अहमद शहा (२५) याचा कपडा विक्रीचा




व्यवसाय असून मयत दिलशाद आणि गुलजार हे दोघे सख्खे भाऊ आहेत. दरम्यान, गुलजार ने त्याच्या मावस बहीण व तिच्या पतीमध्ये २५ जानेवारी रोजी झालेल्या भांडणात मध्यस्थी करून भांडण सोडवले होते. त्यामुळे या तिघा आरोपींनी आपसात संगनमताने गुलजारने भांडण सोडवल्याचा राग मनात धरून याचा काटा गुलजारचा भाऊ दिलशादवर काढून आसिफने त्याच्याकडील सुऱ्याने भोसकून दिलशादची निर्घृण हत्या केल्याचं तक्रारदार गुलजारने फिर्यादीत म्हटले आहे. तसेच, दिलशाद यास मारहाण होत असतानाच गुलजार हा भांडण सोडवण्यासाठी गेला असता त्यालाही मुझफ्फरने लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केले आहे.

## बहीण-भावाने एकत्र आयुष्य संपवलं

**लखनऊ :** वडिलोपार्जित मालमत्तेवरून झालेल्या कौटुंबिक वादात काकूचे टोमणे इतके जिव्हारी लागले की भाऊ आणि बहिणीने विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथे ही हृदयद्रावक घटना घडल्याची माहिती आहे. काकांना पाचशे रुपये देण्यावरून हा वाद झाल्याचंही समोर आलं आहे. मात्र, अशाप्रकारे दोन भावंडांनी आपला जीव दिल्याने परिसरात एकच खळबळ माजली आहेयाप्रकरणी मि ळालेल्या अधिक माहितीनुसार, प्रकाश चंद्र यांचा मुलगा आनंद प्रकाश (३०) आणि मुलगी चंचल (३४) सोमवारी दुपारी घराबाहेर पडले. त्यांनी सुमारे चार किलोमीटर अंतरावर बागई नदीच्या काठावर विष प्राशन केले. घटनास्थळावरून पोलिसांनी विषाचे पाऊच आणि एक स्कूटर जप्त केली आहे.प्रकाश यांनी स्पष्ट केले की, त्यांचा धाकटा भाऊ, रामदास यांची पत्नी, सुधा गुप्ता यांच्यासोबत २०१५ पासून वडिलोपार्जित घर आणि दुकानाबाबत न्यायालयीन खटला प्रलंबित होता. १९ जानेवारी रोजी न्यायालयाने सुधा गुप्ता यांच्या बाजूने निकाल देत दुकानाचे भाडे, घरातील वाटा आणि मासिक पोटगी देण्याचे आदेश दिले.

## इंजिनियर दीप्तीच्या आईची धक्कादायक माहिती; हुंडाबळीनं पुणे हादरलं

**पुणे :** सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या अमानवीय छळाला कंटाळून एका उच्चशिक्षित इंजिनियर विवाहितेनं गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उरुळी कांचन जवळील सोरतापवाडी येथे घडली आहे. दीप्ती मगर-चौधरी असं मृत विवाहितेचं नाव आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात आरोपी असलेली मृत विवाहितेची सासू ही गावची सरपंच असून सासरे व्यवसायाने शिक्षक आहेत. वंशाला दिवा हवा म्हणून सक्तीने गर्भपात करणे आणि माहेरून पैसे आणण्यासाठी तगादा लावणे, या छळाला कंटाळून दीप्तीने हे टोकाचं पाऊल उचलल्याचं समोर आलं आहे.याप्रकरणी दीप्तीची आई हेमलता मगर दिली असून, पोलिसांनी पती रोहन चौधरी, सासू तथा सरपंच सुनीता चौधरी, सासरे कारभारी चौधरी आणि दीर रोहित चौधरी (सर्व रा. सोरतापवाडी, ता. हवेली) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती आणि रोहन चौधरी यांचा विवाह



२३ नोव्हेंबर २०२१ रोजी थेऊर येथे पार पडला होता. लग्नानंतर अवघ्या महिनाभरानंतरच दीप्तीच्या आयुष्यातील संघर्ष सुरू झाला. तिच्या पतीने तिच्या चारित्र्यावर संशय घेण्यास सुरुवात केली. तसेच, 'तू दिसायला सुंदर नाहीस, तुला स्वयंपाक आणि घरकाम जमत नाही, त्यापेक्षा शेतात राबणाऱ्या बाया बऱ्या,' असे टोमणे मारून सासरच्यांनी तिचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. दीप्तीलापहिली मुलगी झाल्याने सासरची मंडळी नाराज होती. दरम्यान, पती रोहन याने एक्सपोर्टचा व्यवसाय बंद पडल्याचे कारण पुढे करत माहेरून १० लाख रुपये आणण्याची मागणी केली. मुलीला त्रास नको म्हणून तिच्या आई-वडिलांनी ही रक्कम दिली होती.

# आलोकने अपमान केला, त्या महिलांनी वळून पाहिल्याने चिडलो

**मुंबई :** लोकल ट्रेनमध्ये किरकोळ कारणावरुन झालेल्या वादानंतर मालाड रेल्वे स्थानकात प्राध्यापक आलोक सिंग यांना चिमट्याने भोसकून ठार मारल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेला आरोपी ओमकार शिंदे याने पोलिसांना धक्कादायक माहिती दिली आहे. आलोकने मला महिलांसमोर ढकललं, अपमानित केलं, या भावनेतून मी संतापलो होतो. आलोकचा जीव घेण्याचा कुठलाही हेतू नव्हता, केवळ चिमट्याने टोचून पळ काढण्याचा इरादा असल्याचा दावा ओमकारने केला.ओमकार शिंदे हा स्वभावाने 'तापट' असल्याचे पोलीस सांगतात. अटक झाली तेव्हा आलोकचा मृत्यू झाला आहे, याची त्याला कल्पना नव्हती, कारण त्याचा उद्देश फक्त चिम ट्याने टोचण्याचा होता, असाही दावा त्याने केल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसने



दिलं आहे.पोलिसांच्या म्हणण्यानुसार, बोरिवली लोकलमध्ये दरवाजाजवळ दोन महिला उभ्या होत्या, त्यांच्या मागे प्राध्यापक आलोक कुमार सिंग आणि त्यांचे एक सहकारी प्राध्यापक होते. तर आरोपी ओमकार शिंदे त्या दोघांच्या मागे उभा होता.आरोपीने सांगितले की जेव्हा त्याने पुढे जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आलोकने त्याला ढकलले आणि विचारले की, दिसत नाही का पुढे म हिला उभ्या आहेत. त्यामुळे महिलांनी मागे वळून पाहिले आणि ओमकारला अपमानित झाल्यासारखे वाटले,' असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, घटनेची आठवण करुन देतानाही आरोपी चिडचिडा आणि रागावल्याचे स्पष्टपणे दिसत होते.

ओमकारच्या वडिलांनीही पोलिसांना सांगितले आहे की, त्यांच्या मुलाला रागावर नियंत्रण ठेवता येत नसून ती शीघ्रकोपी आहे.पोलिसांनी सांगितले की, त्यानंतर ओमकारच्या लक्षात आले की, त्याच्या बॅगमध्ये बनावट दागिन्यांच्या कामासाठी वापरला जाणारा चिमटा आहे. त्याने तो चिमटा बाहेर काढला आणि सिंगला टोचून धडा शिकवण्याचा व पळून जाण्याचा निर्णय घेतला. आलोकला जीवे ठार मारण्याचा आपला हेतू नव्हता, असा दावा ओमकारने केला आहे,' असे अधिकाऱ्याने सांगितले. ट्रेनचा वेग कमी झाल्यावर ओमकारने आलोकला एकदा चिमट्याने टोचले आणि तो पळून गेला. आलोक आपला पाठलाग करेल या भीतीने तो वेगाने पळून गेला.ओमकारला आलोकच्या मृत्यूची कल्पना नव्हती आणि म्हणूनच तो दुसऱ्या दिवशी रेल्वे स्टेशनवर आला, तेव्हा त्याला अटक करण्यात आली, तेव्हा त्याला धक्का बसलाइ असे त्या अधिकाऱ्याने पुढे सांगितले.या प्रकरणाचा तपास करणाऱ्या बोरीवली सरकारी रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) सांगितले की, हल्ल्यात वापरलेली चिमटा अद्याप सापडलेला नाही. पोलिसांनी सांगितले की, ओमकारने घरी जाताना तो चिमटा रस्त्यात फेकून दिला, पण त्याने नेमके ठिकाण सांगितलेले नाही. मंगळवारी पोलिसांनी कुरार गावातील ओमकारच्या घरी झडती घेतली, परंतु चिमटा सापडला नाही. शिंदेला घटनास्थळी नेण्यात आले आणि सविस्तर पंचनामा करण्यात आला.

# भारताला मानहानीकारक पराभवानंतर एकमेव मोठी खंत, महत्वाची गोष्ट करू शकले नाहीत

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** भारताला चौथ्या टी २० सामन्यात मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. पण या पराभवानंतर भारतीय संघाला एक खंत कायमची राहणार आहे. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी केली आणि त्यांनी २१५ धावा केल्या. भारतीय संघ या सामन्यात विजय मिळवेल, असे वाटत होते. पण भारताला या सामन्यात लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. पण हा पराभव भारताच्या जिव्हारी एका गोष्टमुळे नक्कीच लागणार आहे. सूर्याने टॉस जिंकला आणि न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी करण्यासाठी पाचारण केले. यावेळी टीम सेफर्टने भारताच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला. टीम सेफर्टने यावेळी भारताविरुद्ध सर्वात



जलद अर्धशतक साकारण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. टीम सेफर्टने यावेळी ३६ चेंडूंत सात चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ६२ धावांची खेळी साकारली. सेफर्टने यावेळी न्यूझीलंडच्या संघाला १०० धावांची सलामी करून दिली होती. त्यामुळे न्यूझीलंडची या साम न्यात दमदार सुरुवात झाली होती. त्याम ुळे न्यूझीलंड यावेळी अडीचशे धावांचा पल्ला गाठेल, असे म्हटले जात होते. पण त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी सामन्यात पुनरागमन केले. कारण ८.२ षटकांत न्यूझीलंडच्या १०० धावा झाल्या होत्या, पण त्यानंतर न्यूझीलंडला २१५ धावांत रोखण्यात भारताला यश मिळालेभारताचा संघ यावेळी २१६ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरला होता. गेल्या सामन्यात तर त्यांनी १० षटकांतच दीडशे धावा केल्या होत्या. पण या सामन्यात भारताची सुरुवात चांगली झाली नाही. अभिषेक शर्मा भोपळाही फोडू शकला नाही, तर सूर्यकुमार यादव ८ धावा करू शकला. हार्दिक पंड्या तर यावेळी दोन धावांवर बाद झाला. संजू सॅमसनने यावेळी फटकेबाजी केली खरी, पण त्याला २४ धावांवरच समाधान मानावे लागले. रिंकू सिंग ३९ धावा करू शकला. पण शिवम दुबेने या सामन्यात रंगत आणली. कारण शिवमने या सामन्यात २३ चेंडूंत ३ चौकार आणि सात षटकारांच्या जोरावर ६५ धावांची खेळी साकारली. पण भारताला हा सामना जिंकता आला नाही. ही खेळपट्टी फलंदाजीसाठी पोषक होती आणि चांगले दवही पडलेले होते. त्यामुळे फलदाजांसाठी ही खेळपट्टी कुरण असली तरी भारताच्या फलंदाजांना धावा करता आल्या नाहीत, ही खंत त्यांच्या मनात कायम असेल.भारताला चौथ्या टी २० सामन्यात ५० धावांनी पराभव पत्कराव लागला.

## चौथ्या सामन्यात प्रयोग करणं पडलं भारी ; सूर्याने सांगितलं कुठे गमावला सामना

**मुंबई :** भारत विरूद्ध न्यूझीलंड यांच्यात ५ सामन्यांची टी-२० सिरीज खेळवण्यात येतेय. बुधवारी विशाखापट्टणममध्ये या सिरीजमधील चौथा सामना खेळवण्यात आला. यामध्ये न्यूझीलंडने भारताचा ५० रन्सने पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० ओव्हर्समध्ये ७ बाद २१५ रन्स केले. दरम्यान या साम न्यानंतर टीमचा कर्णधार सूर्यकुमार यादवने पराभवाचं कारण सांगितलं आहे.

न्यूझीलंडने २० ओव्हर्समध्ये २१५ रन्सची खेळी केली. २१६ रन्सच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंजियाची सुरुवात खराब झाली. टीम इंडियाने यावेळी बऱ्याच विकेट्स गमावल्या. मात्र शिवम दुबे एका बाजूने उभा होता. त्याने २३ चेंडूत ६५ रन्सची खेळी केल. तर तर रिंकू सिंगने ३० चेंडूत ३९ रन्स केले. या दोघांशिवाय इतर कोणताही फलंदाज मोठी खेळी करता आली नाही.

तर टीम इंडिया १८.४ ओव्हरमध्ये १६५ रन्समध्ये गारद झाली. न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने चार ओव्हर्समध्ये २६ रन्स देत तीन विकेट्स घेतल्या. तो



या सामन्याचा खरा हिरो ठरला. पाच साम न्यांची सिरीज जिंकल्यानंतर टीम इंडिया या सामन्यात प्रयोग करून पाहिला. यामध्ये सहा खास फलंदाजांसह प्रयोग करण्यात आले. यामध्ये हार्दिक पंड्याला फलंदाज म्हणून समाविष्ट करण्यात आलं होतं. यावेळी हर्षित राणाला सातव्या क्रमांकावर पाठवण्यात आलं. मात्र टीम इंडियाचा हा हा प्रयोग अयशस्वी झाला आणि भारताने सामना ५० रन्सने गमावला.

## इशान किशन संघाबाहेर, सूर्याने चौथ्या मॅचसाठी कोणाला दिली संघात संधी

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** तिसऱ्या टी २० सामन्यासाठी भारतीय संघात सूर्यकुमार यादवने मोठा बदल केला आहे. भारताने या सामन्याचा टॉस जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्विकारली. पण या सामन्यासाठी चक्क इशान किशनला संघाबाहेर करण्यात आलं आहे. इशानच्या जाही भारतीय संघात कोणाला संधी देण्यता आली आहे, याची माहिती सूर्यकुमार यादवने टॉस झाल्यावर दिली.तिसऱ्या टी २० सामन्यात संजू सॅमसनच्या जागी इशान किशन यष्टीरक्षण करेल, असे म्हटले जात होते. पण या सामन्यामधून इशान किशनलाच संघाबाहेर करण्यात आले आहे. इशानच्या जागी यावेळी वेगवान गोलंदाज अर्शदीप सिगंला संघात स्थान देण्यात आले आहे.भारताने न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० क्रिकेट मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. वर्ल्ड कप स्पर्धा जेमतेम १५ दिवसांवर असताना भारतीय संघ आज, बुधवारी होणाऱ्या चौथ्या सामन्यांत फिरकी गोलंदाजांना सूर गवसेल अशी आशा बाळगून आहे. कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती या फिरकी गोलंदाजांनी बहरात यावे हीच संघव्यवस्थापनाची अपेक्षा असेल. अभिषेक वर्मा, सूर्यकुमार यादव तसे ईशान किशनच्या फटकेबाजीमुळे भारताने मालिकेतील पहिल्या तीनही सामन्यात वर्चस्व राखले आहे. त्यांच्या झंझावाती फलंदाजीमुळे गोलंदाजांचे विशेषतः फिरकी गोलंदाजांचे अपयश लक्षात आले नाही. वनडे मालिकेत फिरकी गोलंदाजांच्या अपयशाचा फटका बसला होता.कुलदीपने



दोन सामन्यांत दोनच विकेट घेतल्या आहेत. त्याच्या गोलंदाजीवर षटकामागे ९.५च्या गतीने धावा झाल्या आहेत. तिसऱ्या सामन्यात भारताने न्यूझीलंडला १५२ धावांत रोखले होते. त्या साम न्यातही कुलदीपच्या तीन षटकांत ३२ धावा झाल्या होत्या.त्यापूर्वीच्या वनडे मालिकेतील तीन सामन्यांतही तिघांना बाद केले होते. त्याचा इकॉनॉमी रेट ७.२८ असा चिंताजनक होता. वरुण चक्रवर्तीला तिसऱ्या सामन्याच्यावेळी विश्रांती देण्यात आली होती. मात्र तो पहिल्या दोन सामन्यांत धावगतीस आळा घालण्यात अपयशी ठरला होता. त्याच्या माऱ्यात भेदकतेचा अभाव होता. भारताने तिसऱ्या सामन्याच्यावेळी वरुणऐवजी रवी बिश्णोईला संधी दिली होती. त्याच्या वेगवान अचुक माऱ्याने तिघांना बाद केले होते. त्यामुळे चौथ्या सामन्याच्यावेळी कुलदीपऐवजी वरुणला खेळवण्याचा विचारही होत आहे. अष्टपैलू अक्षर पटेलचाही संघव्यवस्थापनास विचार करावा लागणार आहे. पहिल्या सामन्याच्यावेळी त्याचे बोट दुखावले होते.

## भारतीय संघाला कसोटी क्रिकेटमध्ये सतत अपयश का ? राहुल द्रविड यांनी दाखवून दिली चूक



**मुंबई/वृत्तसंस्था :** भारतविरुद्ध न्यूझीलंड यांच्यात टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील तीन सामने भारताने जिंकले. चौथा सामना आज विशाखापट्टनम येथे आज खेळवला जाणार आहे. भारतीय संघ टी-२० मालिकेत दिवसें दिवस चांगली कामगिरी करताना दिसत आहे. पण दिवसें दिवस भारतीय संघ कसोटीत चांगली कामगिरी करत नाही. कसोटीमधील टीम इंडियाचा ग्राफ घसरताना दिसत आहे. आता घसरत्या ग्राफबद्दल ठरर्ह्रींश्र ऊीरींळव यांना काय म्हटले आहेमाजी भारतीय क्रिकेट कर्णधार आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी गेल्या दोन वर्षांत भारताच्या घरच्या कसोटी मालिकेतील पराभवामागील कारणे स्पष्ट केली आहेत. त्यांनी तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळणारे खेळाडू, रेड-बॉल क्रिकेटसाठी तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ नसणे आणि निकाल देणाऱ्या खेळपट्ट्या ही कारणे असल्याचे म्हटले आहे. २०१२ ते २०२४ दरम्यान भारताने घरच्या मैदानावर एकही कसोटी मालिका गमावली नाही. ऋरींीरा ऋरालहळी मुख्य प्रशिक्षकपदाच्या कार्यकाळात, ऑक्टोबर २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या १२ महिन्यांत भारताने दोन घरच्या मैदानावर मालिका गमावल्या. प्रथम, त्यांना न्यूझीलंडकडून ३-० असा व्हाईटवॉश मिळाला आणि नंतर दक्षिण आफ्रिकेकडून २-० असा पराभव पत्करावा लागला.द्रविडने घरच्या मैदानावर कसोटी क्रिकेटमध्ये भारताच्या सततच्या अपयशाबद्दल काही महत्त्वाचे अंतर्दृष्टी शेअर केली. २७ जानेवारी रोजी बेंगळुरू येथे एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, 'प्रशिक्षक म्हणून, मला असे जाणवले आहे की तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळणारे खेळाडू सतत फॉरमॅटमध्ये बदल करत असतात. असे दिसून आले आहे की आपल्याकडे कसोटी सामन्यापूर्वी तीन ते चार दिवस असतात आणि त्यानंतर आम्ही कसोटी सामन्यांसाठी सराव सुरू करतो.' मागे वळून पाहताना असे दिसते की या खेळाडूंनी शेवटचे चार-पाच म हिन्यांपूर्वी लाल चेंडूचा सामना केला होता. हे एक आव्हान आहे. कसोटी सामन्यात फिरकीला अनुकूल किंवा सीमिंग खेळपट्टीवर तासनतास खेळणे सोपे नाही. त्यासाठी कौशल्य आवश्यक आहे.द्रविड म्हणाला की, 'जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या आगमनाने, आता अशा खेळपट्ट्या विकसित केल्या जात आहेत ज्या निकाल देतात.

# बिग बॉस विजेता गौरव खन्ना अनब आकांक्षा चमोला यांचा संसार मोडला?



**मुंबई :** 'बिग बॉस १९'चा विजेता गौरव खन्ना सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चांगलाच चर्चेत आहे. 'बिग बॉस १९' या शोपासून त्याचे वैयक्तिक आयुष्य समोर आले आहे. गौरव खन्ना आणि आकांक्षा चमोला यांच्या लग्नाला ९ वर्ष पूर्ण झाली पण त्यांना मुल नाही, याचा खुलाचा स्वतः गौरवने बिग बॉसच्या घरात केला. त्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित राहिले. मात्र गौरव खन्ना कायम आपल्या बायकोच्या पाठी खंबीर उभा राहिला. 'बिग बॉस १९'नंतर प्रत्येक कार्यक्रमाला गौरव खन्ना आकांक्षा चम ोलासोबत दिसला.

गौरव खन्ना आणि आकांक्षा चम ोलाचा रोमँटिक अंदाज पाहून चाहते कायम भारावून जायचे. मात्र आता गौरव खन्ना आणि आकांक्षा चमोला यांच्या नात्यात दुरावा आल्याचे बोले जात आहे. अभिनेत्री आकांक्षा चमोलाच्या पोस्टने या चर्चांना उधाण आले आहे. आकांक्षाने सोशल मीडियावर गुीढ पोस्ट शेअर केली आहे. ज्यात तीने नात्यांवर भाष्य केले आहे. ज्यामुळे त्यांच्या संसार मोडला असल्याचे बोले जात आहे. दोघांचा मोठा चाहता वर्ग आहे.

जिस रिश्ते की बुनियाद में सिर्फ जरूरतें हैं। वहा दिल हमेंशा कुर्बान होता है।' (जे नाते फक्त गरजांवर आधारित असते, तिथे नेहमीच हृदयाचा त्याग होतो)

गौरव खन्ना आणि आकांक्षा चमोला या दोघांनी या गोष्टीवर अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिली नाही. मात्र या पोस्टने चाहते नाराज आणि टेन्शनमध्ये पाहायला मिळत आहेत. आकांक्षा चम ोलाची ही पोस्ट वाऱ्यासारखी इंटरनेटवर व्हायरल होत आहे. तसेच यावर नेटकरी कमेंट्सचा पाऊस पाडत आहे. काही लोक तर त्यांच्या घटस्फोटाबद्दल अंदाज लावत आहेत. आकांक्षा फॅमिली वीकम ध्ये बिग बॉसच्या घरात आली होती. तेव्हा तिने मुले न होण्याच्या तिच्या निर्णयाबद्दल सांगितले की, 'मला याची भीती वाटत नाही. मुल होणे हे सोपे काम नाही. ही एक मोठी जबाबदारी आहे. म ला वाटत नाही की, मी ते काम इतक्या चांगल्या प्रकारे हाताळू शकेन. या वयात, कोणत्याही वयात. मला माझे करिअर घडवायचे आहे. माझ्या खूप महत्त्वाकांक्षा आहेत. जरी लोक त्याला स्वार्थी म्हणत असले तरी.'

## 'रंग बदलताना दिसत आहेत लोक...' ; दीपाली अनब राकेशची मैत्री तुटली?

**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६' सुरू होऊन तीन आठवडे झाले आहेत. पहिल्या दिवसापासून घट्ट वाटणारी दिपाली आणि राकेशची मैत्री आता तुटण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. एकमेकांसाठी उभे राहणारे, प्रत्येक टास्कमध्ये पाठिंबा देणारे हे दोन मित्र आता समोरासमोर भिडताना दिसत आहेत. नेमकं बिग बॉसच्या घरात असं काय घडलं की त्यांच्या मैत्रीत दुरावा निर्माण झाला? हे जाणून घेऊयात. बिग बॉसने शेअर केलेल्या व्हिडीओत राकेश दिपालीवर थेट आरोप करताना दिसतोय.



व्हिडीओमध्ये पाहू शकता की, राकेश दिपालीला म्हणातो, 'रंग बदलताना दिसत आहेत लोक...' त्यावर दीपाली म्हणते की, 'रंग बदलताना मला त्या दिवशीच दिसले नॉमिनेशनच्या वेळी...' यावर पुन्हा राकेश म्हणतो, 'दिव्या माझी बहीण आहे...मी तिला सपोर्ट करणार...' त्यावर दीपालीने प्रश्न करते की, 'मी तुझी मैत्रीण नव्हते? तू Neutral राहायला हवं होतंस... प्रत्येकजण स्वतःसाठी खेळत आहे इकडे...' शेवटी राकेश बोलतो की,' thankless असतात लोकं...'

बिग बॉसच्या घरातून या आठवड्यात बाहेर जाण्यासाठी आठ सदस्य नॉमिनेट झाले आहेत. ज्यात सोनाली राऊत, दिपाली सय्यद, विशाल कोटियन, प्रभू शेळके, प्राजक्ता शुक्रे, करण सोनावणे, ओमकार राऊत, रुचिता जामदार यांचा समावेश आहे. आता बिग बॉसच्या घरातून या आठवड्यात कोण बाहेर जाणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राकेश आणि दीपाली यांच्यातील तीव्र वादामुळे घरातले वातावरण बदलणार आहे. आता राकेश आणि दीपाली यांच्यातील मैत्री कायमची संपणार की पुन्हा दोघांमध्ये मैत्री होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## लहान वयात ट्रोलिंग नको! मायरा वायकुळच्या पालकांचा मोठा निर्णय

**मुंबई :** सध्या प्रत्येकाला त्याच्या कला इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया खूप मदत करतंय. अगदी गृहीणींपासून ते अनेक सेलिब्रिटींपर्यंत सगळ्यांनाच सोशल मीडियाचा फायदा होत आहे. त्यामध्ये त्यांना त्यांच्या लाइफस्टाइलबद्दल कामांबद्दल आणि मिळवलेल्या यशाबद्दलही अनेक गोष्टी शेअर करायला मिळतात. पुढील बातमीत आपण सगळ्यांच्या मनात घर करुन राहणाऱ्या मायरा वायकुळबद्दल जाणून घेणार आहोत. मायरा वायकुळ ही सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. पण गेल्या काही दिवसांपासून तुम्हाला तिचे कोणतेही रिल्स किंवा फोटो पाहायला मिळाले नसतील. झी मराठीवरील लोकप्रिय मालिका 'माझी तुझी रेशीमगाठ' मधून अवघ्या महाराष्ट्राची लाडकी ठरलेली छोटी मायरा वायकुळ सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चे त आहे. मालिकेत 'परी'च्या भूमिकेतून घराघरांत पोहोचलेली मायरा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर दिसत नसल्याने चाहते संभ्रम



त पडले होते. अखेर यामागचं कारण समोर आलं असून, मायराचे आई-वडील श्वेता आणि गौरव वायकुळ यांनी एक महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय घेत तिचं अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंट बंद केलं आहे. सोशल मीडियापासून दूर गेली असली, तरी अभिनयाच्या क्षेत्रात मात्र मायरा पूर्णपणे सक्रिय आहे. अभिनेता श्रेयस तळपदे यांच्या वाढदिवसानिमित्त नुकतीच एका नवीन मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून, या चित्रपटाचं नाव 'मर्दिनी' असं आहे.

# रणवीर सिंहच्या विरोधात FIR दाखल; 'ती' एक चूक पडली महागात, धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप

**बेंगळुरू :** बॉलिवूडचा 'धुरंधर' रणवीर सिंह चांगलाच अडचणीत अडकला आहे. रणवीर सिंहविरुद्ध बेंगळुरूमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिकडेच एका कार्यक्रमात रणवीरने 'कांतारा' दैवाची विनोदी पद्धतीने नक्कल केली होती. ज्याम ुळे त्याला ट्रोलिंगला समोरे जावे लागले होते. तसेच त्याने यासंबंधित माफी देखील मागितली होती. चावूंडी दैवाचा उल्लेख भूत म्हणून केल्याबद्दल अभिनेत्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले आहे.

बॉलिवूडचा 'धुरंधर' रणवीर सिंह चांगलाच अडचणीत अडकला आहे. रणवीर सिंहविरुद्ध बेंगळुरूमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिकडेच एका कार्यक्रमात रणवीरने 'कांतारा' दैवाची विनोदी पद्धतीने नक्कल केली होती. ज्याम ुळे त्याला ट्रोलिंगला समोरे जावे लागले होते. तसेच त्याने यासंबंधित माफी देखील मागितली होती. चावूंडी दैवाचा उल्लेख भूत म्हणून केल्याबद्दल अभिनेत्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले आहे. रणवीर सिंहविरुद्ध भारतीय दंड संहिता (खझउ) च्या कलम १९६, २९९ आणि ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेंगळुरू येथील वकील प्रशांत म ेथल (४६) यांनी ही तक्रार दाखल केली आहे. एफआयआरनुसार, तक्रारदाराने



आरोप केला आहे की, रणवीर सिंहने अपमानास्पद टिप्पणी केली आणि पूजनीय देवता परंपरेचा अपमान करणारे स्टेज अ‍ॅक्ट केले. अभिनेत्याने पंजुर्ली आणि गुलिगा देवतांशी संबंधित अभिव्यक्तींचे अश्लील आणि हास्यास्पद नक्कल केली. तसेच पवित्र चावूंडी दैवतेचा उल्लेख भूत म्हणून केला आहे. बेंगळुरूमध्ये दाखल केलेल्या एफआयआरमध्ये सांगितले आहे की, चावूंडी दैव ही कर्नाटकच्या किनारी प्रदेशात पूजनीय देवी आहे, जी दैवी स्त्री शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे देवतेचे भूत म्हणून चित्रण करणे ही एक मोठी चूक आहे. ज्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या आहेत आणि भक्तांना मानसिक त्रास झाला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, हा खटला बेंगळुरूमधील मुख्य महानगर दंडाधिकारी (सीएमएम) न्यायालयात चालवला जाणार आहे. ज्याची सुनावणी ८ एप्रिल रोजी होणार आहे.

तक्रारीकर्त्याने सांगितले की, २ डिसेंबर २०२५ रोजी, बेंगळुरूमधील कर्नाटक राज्य बिलियर्ड्स असोसिएशनच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून स्क्रोल करत असताना, त्यांना या सादरीकरणाचा एक व्हिडिओ आढळला. हा व्हिडिओ ब्रीफ चॅट नावाच्या अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. धार्मिक भावना दुखावण्याच्या, समाजात द्वेष आणि शत्रुत्वाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचा आल्याचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

# बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान; २० फेब्रुवारीपर्यंत अर्जाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील नोंदणीकृत संस्थांसाठी योजना सुरु करण्यात आली आहे. ज्या संस्थांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त किंवा सदस्य आहेत आणि ज्या संस्था शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांना पायाभूत सोयी-सुविधांच्या विकासासाठी १० लक्ष रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे. अल्पसंख्याक विकास विभागाचे दि. ७ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेचा लाभ घेण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील अल्पसंख्याक विभागात सादर करणे आवश्यक आहे. योजनेच्या अटी व शर्ती : संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असावी आणि त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळात (विश्वस्त/सदस्य) किमान ५१ टक्के सदस्य बौद्ध समाजातील असावेत. यापूर्वी अशा प्रकारचे अनुदान घेतले असल्यास, त्याचा विनियोग योग्य कारणासाठी झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अनुदानातून खरेदी केलेल्या साहित्याची नोंद स्वतंत्र जडसंग्रह नोंदवहीत करणे आवश्यक असून, त्यावर अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अनुदानातून असे लिहिणे बंधनकारक आहे. अनुदान मिळाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांची यादी ... या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावी. भरलेले अर्ज सर्व कागदपत्रांसह मुदतीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कळविली आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षा ७ फेब्रुवारीला; प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध

**जनसंचलन/बुलढाणा**

जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता ९ वी आणि ११ वीच्या रिक्त जागांसाठीची निवड चाचणी परीक्षा शनिवार दि. ७ फ ेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परिक्षेचे प्रवेशपत्र अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध झाले असून विद्यार्थ्यांनी डाऊनलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निवड चाचणी परीक्षा शनिवार दि. ७ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत इयत्ता ९ वीसाठी जे.व्ही. मेहता हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा, नॅशनल हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा व अंजुमन हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा या तीन परिक्षा केंद्रावर तर ११ वीसाठी पी.एम. श्री स्कुल, जवाहर नवोदय विद्यालय, ता.शेगांव जि.बुलढाणा व म. बि. बुरुंगले हायस्कुल ता.शेगांव जि.बुलढाणा या दोन परिक्षा केंद्रावर निवड चाचणी परीक्षा होणार आहे. विद्यार्थ्यांनी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र नवोदय विद्यालयाच्या www.navodaya.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, पालक आणि विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून त्याची प्रिंट सोबत ठेवावी. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या केंद्राची खात्री करून परीक्षेला येताना प्रवेशपत्रासोबत आवश्यक साहित्य घेऊन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन, पी.एम. श्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य यांनी केले आहे.

# नोकरदार महिलांसाठी बुलढाण्यात सखी निवास वसतिगृह महिलींनी योजनेचा लाभ घ्यावा

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशन बुलढाणा या स्वयंसेवी संस्थेच्यामार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या नियंत्रणाखाली बुलढाण्यातील लव्ह ट्रस्ट समोर खामगाव रोड येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी ङ्गसखी निवासफ हे वसतिगृह सुरु करण्यात आले आहे. या वसतीगृहामध्ये शासकीय, निमशासकीय, किंवा खाजगी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त निवास स्थान उपलब्ध आहे. या वसतीगृहा मध्ये निवास स्थानासाठी सुसज्य व प्रशस्त इमारत, इमारती मध्ये अत्याधुनिक सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची निगराणी, इमारतीसाठी सुरक्षा रक्षक, पिण्यासाठी शुद्ध व थंड पाण्याची व्यवस्था, २४ तास गरम पाणी,महिलांना फिरायला मोकळी जागा असणार आहे. याकरिता बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, किंवा खाजगी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी महिला बालविकास विभागाच्या या योजनेचा जास्तीत जास्त निकषांमध्ये बसणाऱ्या महिलांनी लाभ घेवून सखी निवासच्या व्यवस्थापक मिनाक्षी झिने, कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशन बुलढाणा यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.




# स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्याला उजाळा देत...

## बुलडाणा येथे सदाबहार सामाजिक संघटनेतर्फे देण्यात आली श्रद्धांजली.



**जनसंचलन/ बुलडाणा**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री स्वर्गवासी अजितदादा पवार यांचे अकाली निधनाने राज्यभरात तीन दिवसाचा दुखवटा पाळण्यात आला. अजितदादा असे व्यक्तिमत्व राज्याच्या राजकारणात होते की खंबीर नेतृत्व तसेच स्पष्ट वक्ता म्हणून त्यांची ओळख होती. परंतु त्यांच्या जाण्याने खरंच महाराष्ट्र पोरका झालेला आज बघायला मिळतोय त्याच अनुषंगाने बुलडाण्यात सदाबहार संघटनेकडून आज त्यांना श्रद्धांजली देण्यात आली. ही संघटना वयोवृद्ध लोकांची असून विविध सामाजिक कार्यात अग्रभागी मानली जाणारी संघटना आहे. यामध्ये सर्व निवृत्त सरकारी कर्मचारी असून अजितदादा यांच्या जाण्याने यांच्यामध्ये ही दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज या संघटनेतील सर्व कर्मचारी एकत्र येत सुंदरखेड माऊली पार्क येथे श्रद्धांजली देण्यात आली यासाठी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नारायण रिंढे निवृत्त नायब तहसीलदार यांनी अजितदादा पवार यांच्या संपूर्ण कार्याला उजाळा देत त्यांचा जिवनपट सादर केला. तसेच सुनील पिंपळगाव निवृत्त न्यायालय कर्मचारी यांनी ही आपले मत व्यक्त केले.यावेळी सर्व सदस्यांनी अजितदादा पवार यांच्या विषयी आपले मत व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

# बुलढाण्यात दिवसाढवळ्या रक्तपात! गॅरेजमध्ये मानेवर स्क्रू-ड्रायव्हरचा जीवघेणा वार...

जनसंचलन/बुलढाणा




शहरातील चांडक ले-आउट येथील गजानन ऑटो गॅरेजमध्ये बॅटरीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका मजुरावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना काल २८ जानेवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात कलम ११८(१) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी योगेश निंबाजी मोरे (वय ३८, व्यवसाय मजुरी, रा. आनंदनगर, चिखली रोड, बुलढाणा) यांनी तक्रार दिली आहे. फिर्यादी आपली मोसा गाडी सर्व्हिसिंगसाठी गजानन ऑटो गॅरेजमध्ये घेऊन गेले असता, गॅरेज मालक गजानन सपकाळ यांनी बॅटरी खराब असल्याचे सांगून नवीन बॅटरी आणण्यास सांगितले. त्यानंतर मालकाने आपला मुलगा प्रदीप गजानन सपकाळ याला बॅटरी आणण्यास पाठवले. थोड्याच वेळात वडीलांनी बॅटरी न आणल्याचा जाब विचारला असता, फिर्यादीनेही कामावर जायची घाई असल्याचे सांगितले. याच रागातून आरोपी प्रदीप सपकाळ याने कोणतेही कारण न देता हातातील स्क्रू-ड्रायव्हरने फिर्यादीच्या मानेला भोसकले. त्यामुळे फिर्यादीच्या मानेतून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. जखमी अवस्थेत फिर्यादीला तात्काळ सारू रुग्णालय, बुलढाणा येथे दाखल करून उपचार करण्यात आले. या घटनेचा तपास पोहेका रविंद्र हजारे करत असून पुढील तपास सुरू आहे.

# अजित दादा अमर रहे!

## घोषणांनी बारामती दुमदुमली; काटेवाडीत भावपूर्ण अंत्यसंस्कार

वृत्तसंस्था/ बारामती



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, बारामती तालुक्यातील काटेवाडी येथे हा अंत्यविधी भावपूर्ण वातावरणात पार पडला. अजित पवार यांच्या निधनाबाबत विमान अपघातासह विविध चर्चांना उधाण आले होते. या धक्कादायक घटनेने राजकीय वर्तुळासह सामान्य नागरिकांनाही मोठा धक्का बसला. अंत्यसंस्काराच्या वेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. अमर रहे अमर रहे, अजित दादा अमर रहे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते. काटेवाडी परिसर शोकमग्न झाला होता. अंत्यविधी धार्मिक परंपरेनुसार पार पडला. श्रीराम श्राद्धाचे विधी तसेच वैदिक मंत्रोच्चार करण्यात आले. गंधं उपतिष्ठतु, पुष्पं उपतिष्ठतु, दीपं उपतिष्ठतु, नैवेद्यं उपतिष्ठत अशा मंत्रांच्या घोषात आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करण्यात आली. शासकीय सन्मानाने पुष्पचक्र अर्पण करण्यात आले आणि बंदुकीच्या सलामीद्वारे अंतिम मानवंदना देण्यात आली. अजित पवार यांच्या निधनाने राज्याने एक प्रभावी नेतृत्व गमावले असून, त्यांच्या आठवणी जनतेच्या मनात कायम राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त होत होती.

# बुलढाण्याची लूट, शिवमोग्यात अटक! एलसीबीने दाखवली खरी पोलिसगिरी...

जनसंचलन/बुलढाणा



मुलीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी आयुष्याची कमाई गोळा करणाऱ्या शेतकऱ्याला लुटणाऱ्या आंतरराज्यीय बॅगलिफ्टरला अखेर बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. कर्नाटकातील शिवमोगा येथे थरारक शोधमोहीम राबवत आरोपीकडून चोरीस गेलेले संपूर्ण ५ लाख रुपये हस्तगत करण्यात आले असून, ही कारवाई म्हणजे गुन्हेगारांसाठी थेट इशाराच आहे. दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी रिसोड (जि. वाशीम) येथील शेतकरी नितीन जिजेबा प-हाड यांनी मुलगी श्रुती हिचा बुलढाणा येथील राजश्री शाहू कॉलेजमध्ये बी.ए.एम.एस. प्रवेश लागल्याने मेहकर येथील एसबीआय शाखेतून ५ लाख रुपये काढले. कारने बुलढाण्यात येऊन कॉलेजमध्ये पार्किंग करून आत गेले असता, मागावर असलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी कारचा काच फोडून रक्कम लंपास केली. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशाने एलसीबीचे पथक सक्रिय झाले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढत पथक थेट शिवमोगा (कर्नाटक) येथे पोहोचले. सलग पाच दिवसांच्या शोधानंतर मुख्य आरोपी सुनिल ऊर्फ बाळू रामु बोवी (वय ३२, रा. भद्रावती, शिवमोगा) याला पेस कॉलेज परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने भाऊ विष्णु बोवी सोबत गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी सराईत असून विविध राज्यांत बॅगलिफ्टिंगचे गुन्हे दाखल आहेत. ही धडाकेबाज कारवाई अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक श्रेणीक लोढा, पो.नि. सुनिल आंबुलकर पोलीस उपनिरीक्षक स्था गु शा. अविनाश जायभाये, पोलीस हेअर कॉन्स्टेबल दीपक लेकरूवाळे, चांद शेख, गणेश पाटील, गजानन गोरले, राजू आडवे, पवन मखमले, ऋषी खंडेराव एलसीबीच्या पथकाने पार पाडली

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार...



जनसंचलन/बुलढाणा

ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी झारखंड राज्यातील पलामू जिल्ह्यातील अंम्बाबार येथील संतोष ब्रिजपाल भुइया (२५) याला पोलिसांनी गुरुवारी अटक केली. बुधवारी (दि.२८) दुपारी १ ते सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली. पीडितेचे पालक कामानिमित्त घराबाहेर गेल्यानंतर आरोपीने पीडितेला एकटी असल्याचे पाहून जबरदस्तीने खोलीत नेऊन अत्याचार केला. या प्रकरणी बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ग्रामीण पोलिस करत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८